पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक:नस/९/कावि/ १०१८ /२०१०
दिनांक : २९/७/२०१०

प्रति,

मा.................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक ६/८/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ६/८/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक : ३</u>

दिनांक : ६/८/२०१० वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक ६/८/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दि. १६/७/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २ ) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक :- १) मनपाच्या यशवंतराव चव्हाण रूग्णालयाचे पोस्ट मार्टेम सेंटरकरिता वैद्यकीय अधिकारी या अभिमानाची पदे शासन मंजूर असून कामकाज समाधानकारक असल्याने व सेवेची महापालिकेस आवश्यकता असल्याने डॉ. रोकडे पी.डी. यांना दिनांक १३/११/२००९ पासून ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व डॉ. सोनवणे एम.व्ही. व डॉ. मदने एस.सी. यांना दि. २५/८/२००९ पासून पुढे ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दि. ६/८/२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक :- २) कामाच्या जागेत बदल होत असलेने वॉर्ड क्र. ३३ ऐवजी वॉर्ड क्र.३१ मध्ये जलवाहिन्या टाकणेचे काम मनपाकडील स्विकृत निविदा क्र. ६/५ - २००७/०८ मधून करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
( र.रू. २० लाख )
( दि. ६/८/२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक :- ३) पुणे महानगर नियोजन समितीच्या दैनंदीन कामकाज व कार्यालय स्थापनेचा खर्च हा सुमारे ३८६ लक्षपैकी अर्धा हिस्सा सुमारे १९३ लक्ष पिं.चिं.मनपास द्यावा लागणार असून नविन कार्यालयाच्या वेतन व भत्यावरील खर्च व इतर खर्चासाठी महानगरपालिकेची मान्यता / सहमती बाबतची अपेक्षित माहिती तातडीने पाठविणेबाबत कळविले असल्याने सदर बाब ही आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दि. ६/८/२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषयक्रमांक:- ४) श्रीमती पुणेकर मंजिरी धनंजय यांनी राजीनामा मंजूर करणेबाबत केलेली विनंती, मनपा कोषागरात भरलेले मूळ वेतन व प्र. मुख्यलेखापाल यांचेकडील शिफारस या बाबी विचारात घेऊन त्यांचा दिनांक ०१/०७/२०१० पासून ते आदेशाच्या दिनांकापर्यंतचा गैरहजर कालावधी विनावेतनी करून आदेशाच्या दिनांकापासून त्यांचा राजीनामा मंजूर करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ५) आरोग्य निरिक्षक पदावर नेमणुकीकामी निवड यादीतील १) श्री. पाटील सतिश आनंदराव (खुला ) २) श्री. साळुंके गणेश हिरामण (खुला ) ३) श्री. सोनवणे अतुल छबुलाल (खुला भ.ज.(ब)) ४) श्री. शिंदे भूषण विक्रम (खुला ) ५) श्री. शिंदे नानासाो दशरथ (इतरमागास वर्ग) ६) श्री. साबळे राजू रामभाऊ (इतरमागास वर्ग) ७) श्री. आढाव महेश नानासाहेब (इतरमागास वर्ग) ८) श्री. फल्ले योगेश बबन (इतरमागास वर्ग) या ८ उमेदवारांना त्यांचे नावांपुढे नमूद केलेल्या आरक्षीत प्रवर्गातून पे बॅन्ड र.रू. ९३००-३४८०० ग्रेड पे र.रू.४२०० मध्ये आरोग्य निरिक्षक पदावर नेमणूका देण्यास व निवड यादीतील उमेदवार रूजू न झाल्यास तसेच मनपा आस्थापनेवर आरोग्य निरिक्षक संवर्गात रिक्त होणा-या पदांवर प्रतिक्षा यादीतील १) श्री. भोर नारायण किसन (खुला ) २) श्री. शिरसाठ सागर बंडू (खुला ) ३) श्री. आवटे रोहित यशवंत (इतरमागास वर्ग) ४) श्री. कटयारमल पवनकुमार पुंडलिक (इतरमागास वर्ग) या उमेदवारांना त्या त्या प्रवर्गातून आरोग्य निरिक्षक पदावर नेमणूका देण्यास आणि सदर निवड/प्रतिक्षा यादी ही निवड समितीच्या दिनांकापासून १ वर्षापर्यंत ग्राह्य धरणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ६) ड प्रभाग परिसरामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करणेकामी र.रु.२२,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ७) चिंचवड वॉर्ड क्र. ६४ बळवंत चिंचवडे व्यायामशाळेचे विस्तारीकरण करणेकामी र.रु.२१,६०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ८) प्रस्तावात नमुद तीन अपीलांचे निर्णयास अधीन राहून श्री. तानाजी होनाजी दाते यांना अनु.जमाती प्रवर्गातून पे बॅन्ड र.रू. ९३००-३४८०० ग्रेड पे र.रू. ४४०० मध्ये मुख्य आरोग्य

निरिक्षक पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ९) १) श्री. सगर शाहूराज सुदाम (इतरमागास वर्ग) २) श्री. मुल्ला मुनीर इस्माईल (इतरमागास वर्ग) ३) श्री केंजळे विलास सुभाष (इतरमागास वर्ग) ४) श्री. साळुंके विजय लक्ष्मण (विशेष मागास वर्ग) या उमेदवारांना त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रू. ५२००-२०२०० ग्रेड पे र.रू. २४०० मध्ये वाहनचालक पदावर नेमणूक देण्यास तसेच श्री. बारवाडे राजेंद्र रामचंद्र यांना गुणानुक्रमे सेवाजेष्ठतेचा लाभ न देता पे बॅन्ड र.रू. ५२०० - २०२०० ग्रेड पे र.रू. २४०० मध्ये वाहनचालक पदावर नेमणूक देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १०) वॉर्ड क्र. १२ च-होली येथील सर्व्हे क्र. १०३१ मध्ये स्मशानभुमीचे नुतनीकरण करणे व त्या अनुषंगीक कामे करणेकामी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ११) ब प्रभागातंर्गत मनपाभवन विभागातील रस्त्यावरील पोल व फिटींगची देखभाल दुरूस्ती करणेकामी र.रु.१६,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १२) ब प्रभागातंर्गत चिंचवड विभागातील रस्त्यावरील पोल व फिटींगची देखभाल दुरूस्ती करणेकामी र.रु.१६,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/१०१८/१०
दिनांक : २९/०७/१० चे लगत

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.